**नि.दि.मु.नं.१४८/२०२३ (नि.२७ व ४१ लगत)**

**उलटतपास शपथेवर सुरु**

**उलटतपास प्रतिवादींतर्फे सरकारी अभियोक्ता श्री. ए. आर. कुलकर्णी**

वादी हे कायमस्वरुपी मुंबईला राहतात. सदर मिळकत माझ्याकडे ३० वर्षांपासुन देखभालीकरीता आहे. सदर मिळकत माझ्याकडे देखभालीकरीता आहे हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की सदर मिळकतीची मी देखभाल करतो हे दाखविण्याकरीता माझ्या तोंडी शब्दाशिवाय इतर कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. माझ्याकडे मुखत्यारपत्र आहे. सदर मिळकत ही मुळची देवजी रामजी पालांडे यांची होती. हे म्हणणे खरे नाही की सदर मिळकत ही मुळची देवस्थानच्या मालकीची होती. हे म्हणणे खरे आहे की मिळकत ही देवस्थानची असल्यास परवानगीशिवाय तिचे हस्तांतरण करता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की हस्तांतरणाचा व्यवहार करताना धर्मादाय आयुक्त किंवा मोळेश्वर देवस्थान यांची परवानगी घेतलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की प्रस्तुत दाव्यामध्ये महाराष्ट्र शासनास पक्षकार केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की प्रांत अधिकारी यांनी रिव्हीजन अर्जामध्ये आमचे म्हणणे मागविले होते व आम्हाला संधी दिली होती. हे म्हणणे खरे आहे की संधी दिल्यानंतर रिव्हीजन अर्ज निकाली काढणेत आला. हे म्हणणे खरे नाही की सदर निकालाविरुद्ध अपिलाची तरतुद असताना मी त्याविरुद्ध अपील केले नाही. मी जिल्हाधिकारी यांच्याकडे अपील केले होते. मला सदर अपिलाचा क्रमांक लक्षात नाही. सदर अपिलाची प्रत मी दाखल करण्यास तयार आहे. सदर अपिलाचा निकाल आमच्या विरुद्ध गेलेला आहे. जिल्हाधिकारी यांच्या आदेशाविरुद्ध वरिष्ठ महसुल न्यायालयात मी अपील केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की वरिष्ठ महसुल न्यायालयात आपल्या बाजुने निकाल होणार नाही याची खात्री झाल्यानंतर दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला आहे. हे मला माहिती नाही की महाराष्ट्र शासनाने देवस्थान मिळकतीला देवस्थानचे मालकसदरी नाव लावण्याचे परिपत्रक काढले किंवा कसे. मी सरकारपक्षातर्फे दिलेली कैफियत वाचलेली नाही. हे मला आठवत नाही की कैफियत न वाचताच मी नाकारली किंवा कसे. हे मला माहिती नाही की कैफियतीमध्ये सरकारपक्षाने सदर शासनाच्या परिपत्रकानुसार आमच्या झालेल्या नोंदीचे पुनर्विलोकन करुन देवस्थानचे नाव लावले असे कथन केले आहे. मी दावा मिळकतीचा चालुचा ७/१२ उतारा पाहिलेला नाही. दाव्यासोबत दाखल केलेले ७/१२ उतारे मी पाहिलेले नाहीत. हे मला माहिती

नाही की सदर उता-यांवर रिव्हीजन अर्जातील निकालाप्रमाणे मी मोळेश्वर देवस्थानची नोंद झाली आहे. मी मुखत्यारपत्रासोबत लावलेला मिळकतीचा उतारा पाहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की सदर उता-यावर मोळेश्वर देवस्थान याची नोंद झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की पालांडे यांना दावा मिळकतीची मालकी कधीही नव्हती. हे मला आठवत नाही की पालांडे यांच्याकडुन खरेदीपत्र करतेवेळी त्यांच्याकडे मिळकत कशी आली याची चौकशी केली होती किंवा कसे. खरेदीपत्र करतेवेळी आम्ही जाहीर नोटीस दिली होती. सदर जाहीर नोटीस या प्रकरणात दाखल केलेली नाही. सदर जाहीर नोटीस किती तारखेला व कुठल्या वृत्तपत्रात दिली होती हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर जाहीर नोटीस दिल्याबाबतचा मजकुर खरेदीपत्रात नमुद करण्यास कोणतीही अडचण नव्हती. तसा मजकुर खरेदीपत्रात का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की जाहीर नोटीस दिली नव्हती त्यामुळे तसा मजकुर खरेदीपत्रात नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की सरकारच्या अध्यादेशानुसार दावा मिळकतीस देवस्थानचे नाव लागले असताना व कोणतेही कारण घडले नसताना हा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की सदर मिळकतीची माझ्या पुर्वहक्कदारांना अथवा मला मालकी नव्हती व नाही. हे म्हणणे खरे नाही की केवळ बेकायदेशीर दस्ताचे आधारे झालेल्या नोंदीचा गैरफायदा घेवुन सदरचा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की वादी यांना स्वत: येवुन पुरावा देण्यास कोणतीही अडचण नाही. हे म्हणणे खरे नाही की मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्थळ : वाई.
दिनांक : २५.०४.२०२५

(ए. ए. पाचरणे)
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, वाई.